# <u>प्रेसनोट</u>

दि. २४/१२/२०२३

**मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस शिपाई यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ८८६/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) संतोष सुरेश साळुंखे, वय ४४ वर्ष पद - सहायक पोलीस निरीक्षक (वर्ग-२),<br>२) संदीप भिमा रावते, वय ३६ वर्ष, पद - पोलीस शिपाई.<br>दोघे नेमणुक - मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ८,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ८,०००/- रुपये (आठ हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | २३/१२/२०२३ |
| सापळा दिनांक | २३/१२/२०२३ |

ठिकाण :- कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर चे गेट जवळ, सिद्धी हॉस्पीटल समोर रोडवर, मंचर, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या वाहनाच्या अपघाताबाबत मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे माहे डिसेंबर २०२३ मध्ये गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्याचा तपास मंचर पो.स्टे. चे सहायक पोलीस निरीक्षक लोकसेवक क्र. १ संतोष साळुंखे करीत होते. तक्रारदार यांचे अपघाताचे गुन्ह्यातील वाहन तक्रारदार याना परत देण्यासाठी मदत करतो म्हणून लोकसेवक क्र. १ संतोष साळुंखे व लोकसेवक क्र. २ संदीप रावते यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक क्र. १ संतोष साळुंखे व क्र. २ संदीप रावते यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे अपघातातील वाहन परत देण्यासाठी तडजोडीअंती ८,०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी केली व लोकसेवक क्र. २ संदीप रावते यांनी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये ८,०००/- (आठ हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.